दै. लोकमत दि. 02/06/2022

# महिलेच्या खून प्रकरणात मुक्रमाबाद पोलिसांनी गाठला सुतावरून स्वर्ग

## दोघांना अटक, अनैतिक संबंध आणि पैशाच्या वादातून घडली घटना

क्राईम स्टोरी

**संजय दमकोंडवार**

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुक्रमाबाद** : सावरमाळ, ता. मुखेड येथील महिलेच्या खून प्रकरणाचा उलगडा करण्यात मुक्रमाबाद पोलिसांना यश आले. पोलिसांनी याप्रकरणी दोघांना अटक केली. या प्रकरणात पोलिसांनी सुतावरून स्वर्ग गाठला. बेटमोगरा, ता. मुखेड येथील महिलेचा सावरमाळ सावळी शिवारात नियोजनबद्ध खून करण्यात आला, सावरमाळ सावळी ते बेटमोगरा ८० किलोमीटरचे अंतर. सावरमाळ सावळी परिसरात खून कसा झाला? का झाला? कशासाठी झाला? आदी प्रश्न अनुत्तरित होते. पोलिसांनी या सर्व प्रश्नांची उकल केली.

सावगाव माळ येथे महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत मिळाला. तिची ओळखही न पटल्याने घटनास्थळावरच तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत महिलेच्या हातावर बापूराव भेंडे असे नोंदविलेले होते. हा पुरावा पोलिसांना गवसला आणि तपास सुरू झाला. मुक्रमाबादचे सहायक पोलीस निरीक्षक संग्राम जाधव, पोलीस उपनिरीक्षक गजानन कांगणे, गोपीनाथ वाघमारे, लेखनिक दिलीप तग्याळकर, माधवराव मरगेवाड, चालक उत्तम गायकवाड यांच्या पथकाने खुनाचा तपास सुरू केला. तपासाची चक्रे फिरवली. वैद्यकीय अहवालात तिचा दगडाने ठेचून खून करण्यात आल्याचे नमूद असल्याने पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला.



### बेटमोगरा ते सावरमाळ ८० किलोमीटर

- मयत महिलेच्या खूनामागे अनैतिक संबंध आणि पैशाचे व्यवहार असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी या प्रकरणी दोन आरोपींना अटक केली आहे. त्यांची पोलीस कोठडीही काढली. बेटमोगरा ते सावरमाळ हे अंतर ८० किलोमीटर आहे. दूरच्या गुन्ह्याच्या तपास पोलिसांनी केला.
- हातावर गोंदलेल्या नावावरून सावरमाळ सावळी शिवारात निर्जन स्थळी झालेल्या खूनाचा तपास आठ दिवसात लावण्यात पोलिसांना यश आले. जिल्हा पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अतिरिक्त पोलीस प्रमुख निलेश मोरे,देगलूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुक्रमाबादचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संग्राम जाधव, पोलीस उपनिरीक्षक गजानन कागणे, गोपीनाथ वाघमारे, लेखणीक दीपक तग्याळकर, माधवराव मरगेवाड, चालक उत्तम गायकवाड यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

महिलेचा फोटो घेऊन कर्नाटकातील औराद, चिंताकी, तेलंगणातील मदनूर, निजामाबाद अशा विविध पोलीस स्टेशनला भेटी देऊन काही सुगावा लागतो काय? हे तपासले.

मात्र, पोलिसांच्या हाती काही लागले नाही. तीन दिवसांनंतर मात्र गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. यावरून गजानन कांगणे यांनी बेटमोगरा येथे भेट देऊन महिलेची ओळख पटविली. अंगावरील कपडे, चप्पल, दागिने आणि फोटो दाखविल्यावर ही महिला ईंदरबाई बापूराव गायकर असल्याचे निष्पन्न झाले. पुढे खून कोणी केला? याचा तपास पोलीस यंत्रणेने सुरू केला.